दै. लोकमत दि. 07-12-23

# भंगार चोराने उडवले ३२ तोळे सोने, फुटेज तपासून केले जेरबंद

## रेंजर सायकलवरून केली चोरी : ३० तोळे सोने केले जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील वसंतनगर भागात तिरुपती येथे दर्शनासाठी गेलेल्या कुटुंबीयाच्या घरावर चोरट्याने डल्ला मारला होता. तब्बल ३० तोळे सोने लंपास केले होते. या प्रकरणात पोलिसांनी तीन किलोमीटरचे सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीची ओळख पटवीत त्याला अटक केली. त्याच्या घरातूनच सर्व मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे आरोपी हा गजाळी, भंगार चोरी करीत होता; परंतु या घरातून त्याला ३२ तोळे सोन्याचा जॅकपॉट लागला होता; अशी माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली.





### चालण्याची विशिष्ट पद्धत हेरली

■ आरोपी हा भुरटा चोरटा होता. त्याचा कुठलाच रेकॉर्ड पोलिसांकडे नव्हता. पोलिसांनी डोक्याला बांधलेला पांढरा दुपट्टा, कपडे आणि लंगडत चालण्याची विशिष्ट पद्धत यावरून तीन किलोमीटरपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज तपासले, तसेच आजूबाजूच्या लोकांना विचारपूस केली; त्यावरून आरोपीची ओळख पटली. गेले बारा दिवस आरोपीने हे सर्व सोने घरातच ठेवले होते.

वसंतनगर येथील गणेश जाधव हे कुटुंबीयांसह तिरुपती येथे गेले होते. त्यात २० नोव्हेंबरच्या मध्यरात्री रेंजर सायकलवरून आलेल्या राजू बाबूराव गायकवाड, रा. महेबूबनगर याने कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. यावेळी बेडमध्ये ठेवण्यात आलेले ३२ तोळ्याचे दागिने त्याने लांबविले. या प्रकरणात शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी पोनि. मोहन भोसले यांना तपासाच्या सूचना दिल्या होत्या.

पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात सायकलवरून आलेला एक संशयित आढळून आला. त्याच प्रकारचा पेहराव असलेला इसम त्याच रस्त्यावरील तब्बल ३ किलोमीटरपर्यंतच्या कॅमेऱ्यात कैद झाला होता. विशेष म्हणजे आरोपी हा रेकॉर्डवरील नसल्यामुळे पोलिसांना अडचणी येत होत्या; परंतु पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे त्याचा शोध घेऊन त्याच्या घरी धाड मारली. यावेळी घरातच पाटल्या, बांगड्या, तोडे, नेकलेस, मिनी गंठण, बिनले, सोनसाखळी, असा एकूण ३० तोळे सोन्याचा ऐवज आढळून आला, तसेच गुन्ह्यात वापरलेली रेंजर सायकल पोलिसांनी जप्त केली आहे. गुन्हे शोध पथकाचे पोउपनि मिलिंद सोनकांबळे, पोहेकॉ. रविशंकर बामणे, देवीसिंग सिंगल, शेख अझहर, लिंबाजी राठोड, अंकुश लंगोटे, दत्ता वडजे, बाळकृष्ण मुरकुटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दै. सकाळ दि. 07-12-23

# वसंतनगरमध्ये ३० तोळे सोन्याचे दागिने चोरणारा जेरबंद

## पोलिस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाची कारवाई; सीसीटीव्ही कॅमेरे तपासून शोध

**नांदेड, ता. ६ :** वसंतनगर भागात घरफोडी करून लाकडी पलंगामध्ये ठेवलेले १६ लाख २८ हजार रूपये किंमतीचे ३२.५ तोळे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या चोरट्यास शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने बुधवारी (ता. सहा) अटक केली आहे. यासाठी पोलीसांनी जवळपास शंभरावर सीसीटीव्हीची तपासणी केल्यानंतर चोरटा हाती लागला आहे. या कामगिरीबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पथकाला दहा हजार रुपयांचे बक्षीसही दिले आहे.

वसंतनगर येथील एका घराला कुलुप असल्याचे पाहून चोरट्याने मध्यरात्री जाऊन चोरी केली होती. त्यानंतर शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरिक्षक मोहन भोसले तसेच गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, पोलीस जमादार रविशंकर बामणे, देवसिंग सिंगल, अझहर शेख, लिंबाजी राठोड, अंकुश लंगोटे, दत्ता वडजे, बाळकृष्ण मुरकुटे यांनी शोध सुरू केला. घटनास्थळी जाऊन पाहणी करुन आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले असता एक व्यक्ती मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास त्या घराचे दिशेने जात असताना व घरासमोरील दरवाज्यासमोर फिरताना दिसला. त्यावरुन इतर आजुबाजुचे कॅमेरे तपासले असता तोच व्यक्ती सायकलीवर समोर हॅंडलला दोन पिशव्या घेऊन जाताना दिसला.

सदरील आरोपीचा शोध घेण्यासाठी पथकाने केवळ ह्युमन इंटेलिजन्सच्या आधारावर सदरचा गुन्हा कसोशीने तपास करुन १२ दिवसात उघडकीस आणला. आरोपी राजू बाबुराव गायकवाड (वय ३४, रा. [illegible] नांदेड) यास अटक केली. त्याने चोरी केलेले १५ लाख रुपये किंमतीचे ३० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व तीन हजार रूपये किंमतीचे चांदीचे पैंजण तसेच गुन्ह्यात वापरलेली सात हजार रुपये किंमतीची सायकल असा एकुण १५ लाख दहा हजार रूपयाचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.